BHIWANDI NIZAMPUR
CITY MUNICIPAL
CORPORATION
BHIWANDI (Dist. Thane)
MAHARASHTRA
OLD S.T.STAND, KAP-ALI,
BHIWANDI - 421 302, DIST.THANE.

भिवंडी निजामपूर शहर महानग
भिवंडी, जि.ठाणे
महाराष्ट्र,
जुना एस.टी.स्टॅण्ड,कापआळी,
भिवंडी - ४२१ ३०२, जि.ठाणे.

TEL : 02522-33 115, FAX : 02522-52074

जा.क्र./भिनिशमनपा/नगररचना/बा.प्र.क्र. -०१२-२०१३/ ८०८५

दिनांक : २९-१२-

प्रारंभ प्रमाणपत्र

प्रति,

श्री. धनजी नारण पटेल स्वतः व इतर तर्फे मुखत्यारपत्रधारक
व्दारा :- के. के. व असो.
१२०,एन.जी.कंपा.धामणकर नाका,भिवंडी

विषय :- बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र मिळणेबाबत
मौजे-कामतघर येथील स.नं.१०८/२,३,४ व १७७/४

संदर्भ :- १) ह्या कार्यालयाकडील बांधकाम परवानगी क्र.न.र.वि./१७६५ दि.०३/१०/२०१३
२) आपला दि.१८/०८/२०१४ रोजीचा अर्ज व दि. १०/१२/२०१४ रोजीचे पूर्तता पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयांकीत जागेमध्ये आपणांस बांधकाम परवानगी संदर्भ क्र.१ अन्वये मंजूर करणेंत आली आहे. आता संदर्भ क्र. २ अन्वये इमारतीसाठी बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रे अपेक्षिले आहे.

सबब आपणांस कळविण्यात येते की आपण वरील मंजुर परवानगीतील शर्तींच्या पूर्ततेस अधिन राहून तसेच खालील अटीस अधिन राहून इमारतीचे बांधकाम करण्यास अनुमती देण्यात येत असून जोत्यापर्यंत बांधकाम पूर्ण करावे व त्यानंतर जोतातपासणी प्रमाणपत्र मिळणेसाठी विकास नियंत्रण नियमावलीतील अपेंडीक्स "XII" नुसार अर्ज करावा व अपेंडीक्स "XIII" नुसार जोतातपासणी प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतरच पायावरील पुढील बांधकामास सुरुवात करावी.

१) प्रस्तुत प्रकरणी मा.जिल्हाधिकारी.ठाणे यांचेकडील आदेश क्र.महसूल/क-१/टे-३/एनएपी/कामतघर-भिवंडी/एस.आर.-(१८/२०१४)५५/२०१४ दि. २३/०७/२०१४ मधील सर्व अटी व शर्ती आपणांवर बंधनकारक राहतील.
२) प्रस्तुत प्रकरणी उर्वरीत स्थानिक संस्था कराची रक्कम स्थानिक संस्था कर विभागाकडील निदेशानुसार महानगरपालिकेत जमा करणे आपणांवर बंधनकारक राहतील.

आपला,

सहाय्यक संचालक,नगररचना,
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.
भिवंडी करीता

प्रत :- प्रभाग अधिकारी,प्रभाग क्र. यांना माहितीसाठी रवाना.

plinth - C-C

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी,

बां.प्र.क्र./५८/२०१३-२०१४

जा.क्र.नं.र.वि./ २५०९

दिनांक :- २०।१।१५

(ॲपेंडीक्स XIII )

नियम क्र.६(४)

## जोता तपासणी प्रमाणपत्र

प्रति,

श्री. धनजी नारण पटेल स्वतः व इतर तर्फे मुखत्यारपत्रधारक

व्दारा :- के. के. व असो

१२०/३०५,एन.जी.कंपा,धामणकर नाका,भिवंडी

विषय :- जोता तपासणी प्रमाणपत्र मिळणेबाबत (इमारत प्रकार ए व बी)
मौजे-कामतघर येथील स.नं. १०८/२,३,४ व स.नं. १७७/४

संदर्भ :- १) या कार्यालयाची बांधकाम परवानगी क्र.न.र.वि./१७६५ दि.०३/१०/२०१३

२) आपले इंजिनिअर ह्यांची पायापर्यंतचे बांधकाम पूर्ण झाल्याबाबतची सूचना पत्र दि.१५/०१/२०१५ रोजीचा अर्ज

३) स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचे दि.१५/०१/२०१५ रोजीचे प्रमाणपत्र.

महोदय,

संदर्भिय क्र.१ अन्वये आपणांस मौजे-कामतघर येथील स.नं. १०८/२,३,४ व स.नं. १७७/४ मधील, ६२२१.०० चौ.मी. क्षेत्रावर सुधारीत बांधकाम परवानगी देण्यांत आली होती. त्यानुसार संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये आपण इमारत प्रकार ए व बी या इमारतीचे जोत्यापर्यंतचे बांधकाम पूर्ण केल्याचे कळविले आहे. दि.१७/०१/२०१५ रोजी जागेची प्रत्यक्ष स्थळपाहणी विभागाच्या कनिष्ठ अभियंता यांनी केली असता, आपण मंजूर नकाशामध्ये दर्शविल्या प्रमाणे इमारतीचे जोत्यापर्यंतचे बांधकाम सर्वसाधारणपणे परवानगीनुसार केले असल्याने व संदर्भ क्र. ३ अन्वये सादर केलेले स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचेकडील प्रमाणपत्र /नकाशे पाहता इमारतीचे जोत्यावरील बांधकाम मंजुर नकाशानुसार पुढे चालु ठेवण्यास बांधकाम परवानगीपत्रांतील अटी व शर्ती कायम ठेवून खालील अटींवर मजुरी देण्यांत येत आहे.

१) भूकंपाचा संभाव्य धोका विचारात घेऊन ईमारतीच्या सांगाडयाची संरचना भूकंप प्रतिबधक ईमारतीसाठी आवश्यक असणाऱ्या आवश्यक संरचनेप्रमाणे परवानाधारक व अहर्ताधारक स्ट्रक्चरल इंजिनियर यांचेकडील प्राप्त संरचनेच्या नकाशाप्रमाणे पुढील बांधकाम करणेची दक्षता घेण्यांत यावी.

२) जोता तपासणी प्रमाणपत्रानंतर जोत्यामध्ये कोणत्याही स्वरुपाचे फेरफार केल्यास, देण्यात आलेले प्रमाणपत्र रद्द करण्यांत येईल व असे बांधकाम अनधिकृत समजून काढुन टाकण्यांत येईल याची कृपया नोंद घ्यावी.

२/...

३) सांडपाणी,मैला निर्मुलनासाठी मनपाचे गटार नसल्यास त्याची व्यवस्था करण्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदारांची राहील.

४) मनपाच्या पाणी पुरवठ्याची क्षमता व शहराची वाढती लोकसंख्या विचारांत घेता,बांधकामाला पाणीपुरवठा करणे मनपास शक्य नसल्यास अर्जदाराने विषयाधीन विंधन विहीर / कुपनलिकेतील पाणी हे प्रस्तावित बांधकामासाठी वापरणे अर्जदार/विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

५) विकासकर्त्याने/जमिनधारकाने बांधकाम वापर दाखल्यापूर्वी पायाभूत सुविधा कुंपणभितीसह विकसित करणे बंधनकारक राहील

६) करण्यांत आलेल्या बांधकामात फ्लाय ॲश विटा व त्या आधारीत साहित्य वापर केला असल्याचे संबंधित आर्किटेक्ट/इंजिनिअर यांचेकडील प्रमाणपत्र वापर परवान्यापूर्वी सादर करावे लागेल.

७) भविष्यात इलेक्ट्रीक पोल/ट्रान्सफार्मर करीता जागेची आवश्यकता मनपा अथवा विद्युत मंडळास भासल्यास सामासिक अंतरामधुन अशी जागा उपलब्ध करुन द्यावी लागेल.

८) प्रस्तुत प्रकरणी उर्वरीत उपकराची रक्कम ही बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्राच्या दिनांका पासून (दि. २९/१२/२०१४ पासून) एक वर्षाचे आंत भरणे आपणांवर बंधनकारक राहील

९) प्रस्तुत प्रकरणी उर्वरीत स्थानिक संस्था कराची रक्कम ही स्थानिक संस्था कर विभागाच्या निर्देशानुसार,इमारत बांधकामाच्या प्रमाणात अथवा इमारतीच्या वापर दाखल्यापूर्वी जमा करणे आपणांवर बंधनकारक राहील.

१०) प्रस्तुत प्रकरणी १८ मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधित होणारे ११९ चौ.मी. क्षेत्र हे आपण नोंदणीकृत दस्त क्र. ८२००/२०१३ दि. २०/९/२०१३ अन्वये ताबा पावतीसह महानगरपालिकेचे नांवे करुन दिलेले असून, उक्त बाधित होणाऱ्या क्षेत्रावर भोगवटदार सदरी महानगरपालिकेचे नांव दाखल झालेले ७/१२ उतारा व फेरफार हे तीन महिन्यात अथवा इमारतीच्या दोन स्लॅब होण्यापूर्वी सादर करणे आपणांवर बंधनकारक राहील.

आपला,

नगररचनाकार,
भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका,
भिवंडी

प्रत :- १) प्रभाग अधिकारी,प्रभाग क्र. यांना माहितीसाठी रवाना.
२) प्रशासकीयअधिकारी,शिक्षण मंडळ,भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी यांचेकडे माहितीकरीता व आवश्यक त्या कार्यवाही करीता अग्रेषित.